श्रीमती दानकुँवर हिन्दी कन्या विद्यालय समिती,

(हिन्दी भाषिक अल्पसंख्याक संस्था संचलित)

श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय, जालना

# मराठी भाषा व वाङ्मय विभाग

NAAC B+


संस्थापक
स्व.सेठ कुंदनलालजी अग्रवाल

## *‘द्वितीय वर्ष विषय निवड व मराठी विषयातील रोजगार संधी’*

## *विद्यापीठ स्तरीय एकदिवशीय आभासी कार्यशाळा*

## अहवाल जुलै-२०२५

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत सर्व विद्याशाखा आणि सलग्नीत महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची प्रत्यक्ष अंमलबाजवणी २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून सुरू झाली आहे. पहिल्या वर्षीच्या यशस्वी अंमलबजावणी नंतर २०२५–२०२६ या शैक्षणिक वर्षात द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विषय निवड करतांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय, जालना मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि जे.ई.एस. महाविद्यालय, जालना मराठी भाषा विभाग यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार दि. ३१ जुलै २०२५ रोजी ‘द्वितीय वर्ष विषय निवड व मराठी विषयातील रोजगार संधी’ या विषयावर विद्यापीठ स्तरीय एकदिवशीय आभासी कार्यशाळा घेण्यात आली.

**कार्यशाळेची उद्दिष्ट्ये :**

१. द्वितीय वर्ष विषय निवड करतांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे.

२. द्वितीय वर्ष विषय निवड करतांना लक्षात घ्यावयाच्या बाबी संदर्भात मार्गदर्शन करणे.

३. मराठी विषयातील विविध व्यवसायिक संधीबाबत विद्यार्थ्यांना अवगत करणे.

४. मराठी विषयाचे अध्ययन करण्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.

Smt. Dankunwar Mahila Mahavidyalaya
JALNA




कार्यक्रमाचे बॅनर

स्ट्रीमयार्ड माध्यमावर आयोजित कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जे.ई.एस.महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ.यशवंत सोनुने यांची तर उद्घाटक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सर्जेराव जिगे यांची उपस्थिती होती. यावेळी मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ.राजकुमार एल्लावाड प्रमुख मार्गदर्शक म्हणून तर प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.जितेंद्र अहिरराव यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ.वासुदेव उगले कार्यशाळा संयोजक म्हणून उपस्थित होते.

बदलत्या काळाची गरज ओळखून स्वीकारण्यात आलेले नवे शैक्षणिक धोरण शिक्षण व्यवस्थेची पारंपरिक चौकट भेदून नवा दृष्टिकोन निर्माण करणारे आहे. विद्यार्थ्यांला एका विशिष्ट चौकटीत बंदिस्त न करता, त्याच्या आवडीनुसार कौशल्याधारित शिक्षणाची तरतुद या धोरणात करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या संदर्भात मातृभाषेतून रोजगाराच्या अनेक नव्या संधी निर्माण करणारा अभ्यासक्रम मराठी अभ्यास मंडळाने तयार केला आहे. पहिल्या वर्षाची यशस्वीरित्या अंमलबजावणी झाल्यानंतर दुसऱ्या वर्षात हा अभ्यासक्रम

Smt. Dankunwar Mahila Mahavidyalaya JALNA

राबविला जात असल्याची माहिती डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सर्जेराव जिगे यांनी दिली.




कार्यक्रमाचे उद्घाटक-डॉ.सर्जेराव जीगे (उजवीकडून)

पुढे बोलतांना डॉ. जिगे म्हणाले, ज्ञान,मूल्य आणि कौशल्य ही नव्या शैक्षणिक धोरणाची त्रिसूत्री आहे. या त्रिसूत्रीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची आवड, निवड आणि सवड विचारात घेऊन अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या अभ्यासातून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. मराठी भाषा खऱ्या अर्थाने रोजगार उपलब्ध करून देणारी भाषा होण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण आणि त्याला सुसंगत तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम सहायक ठरणार असल्याचे डॉ.जिगे शेवटी म्हणाले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात, द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी विषय निवडतांना कोणत्या बाबी लक्षात घ्याव्यात, मराठी भाषेत शिक्षण घेतल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधी या बाबत अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ.राजकुमार एल्लावाड यांनी

Smt. Dankunwar Mahila Mahavidyalaya
JALNA

माहिती दिली. मराठी विषयाचे सखोल ज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून मराठी भाषेतून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. समाज माध्यमांसाठी दर्जेदार मजकूर लेखनातून घरबसल्या रोजगार उपलब्ध होऊ शकतो. पटकथा लेखन, नाट्यपरीक्षण, अनुवाद, भाषांतर आदी क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी आज घडीला उपलब्ध असल्याची माहिती डॉ.एल्लावाड यांनी यावेळी दिली.




कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते-डॉ. राजकुमार यल्लावाड

नवीन शैक्षणिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर अंमलबजाणीच्या पहिल्या टप्प्यावर अनेक अडचणीचा सामना करावा लागला, विद्यापीठ प्रशासन, अभ्यास मंडळ, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यातील समन्वयातून त्या अडचणी सोडवल्या गेल्या. द्वितीय वर्षात विषय निवड करतांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण तज्ञांच्या माध्यमातून केले जावे, या हेतूने सदरील कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याचे अध्यक्ष डॉ.यशवंत सोनुने यांनी सांगितले. प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, प्रभारी प्राचार्य डॉ.जितेंद्र अहिरराव यांनी कार्यशाळेला शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

Smt. Dankunwar Mahila Mahavidyalaya
JALNA

कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका आणि उद्दिष्ट्ये संयोजक डॉ. वासुदेव उगले यांनी आपल्या प्रास्ताविकातून स्पष्ट केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अनेक महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने आभासी पद्धतीने या कार्यशाळेत सहभागी झाले होते. कार्यशाळेचे सूत्रसंचालन सहा. प्रा. अशोक गारकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.बाबू श्रीरामे यांनी केले.

**माध्यमांची दखल**

उपक्रमाची विविध मुद्रित माध्यमांनी दखल घेतली. प्रामुख्याने दिव्य मराठी,नवराष्ट्र या नामांकित वृत्तपत्रांनी सविस्तर वृत्त प्रकाशित केले.

**<u>दैनिक दिव्य मराठी</u>**




**<u>दैनिक नवराष्ट्र</u>**




Marathwada plus Edition
Aug 02, 2025 Page No. 1
Powered by: Navarashtra.com

Smt. Dankunwar Mahila Mahavidyalaya JALNA

प्रा. अशोक श्री. गारकर
(मराठी भाषा व वाङ्मय विभाग)

विभागप्रमुख
मराठी भाषा व वाङ्मय विभाग
श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय,जालना

Incharge Principal
Smt.Dankunwar Mahila Mahavidyalaya
Jalna